# मुंबई विद्यापीठ

क्र. 2026.APRF.MTS.000.33926.

विषय : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये परीक्षांकरीता नियुक्त विषयाचे अध्यक्ष/प्राध्यापक यांच्या अनिवार्य उपस्थितीबाबत.

**परिपत्रक :**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित मानव्यविद्या, विज्ञान व तंत्रज्ञान, आंतरशाखीय, वाणिज्य व व्यवस्थापन महाविद्यालयांचे संचालक /प्राचार्य, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे, कल्याण, तळेरे उपकेंद्रांचे समन्वयक व सहायक कुलसचिव आणि संबंधीत विषयासाठी नियुक्ती करण्यात आलेल्या अध्यक्ष/प्राश्निक यांना या परिपत्रकाद्वारे असे सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील लागू तरतूदी तसेच विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन संबंधी प्रचलित नियमावलीनुसार सर्व परीक्षांकरीता नियुक्त अध्यक्ष/प्राश्निक, परीक्षक, नियामक व अनुवादक (Chairman, Paper Setter, Examiner, Moderator & Translator) यांच्यावर सोपविण्यात आलेली कर्तव्य ही वैधानिक स्वरूपाची असून त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे.

त्या अनुषंगाने आपणांस निर्देशित करण्यात येते की, संबंधीत विषयाची परीक्षा ज्या दिवशी नियोजित असेल, त्या दिवशी अध्यक्ष, प्राश्निक यांनी परीक्षेच्या नियोजित वेळेपुर्वी अनिवार्यपणे परीक्षा विभागाच्या हस्तलिखिते कक्षातील, नियंत्रण कक्ष, सहावा मजला, छत्रपती शिवाजी महाराज भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०००९८ येथे प्रत्यक्ष उपस्थित रहाणे आवश्यक व बंधनकारक राहील.

तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील ज्या प्राध्यापकांची अध्यक्ष/प्राश्निक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्या संबंधीत प्राध्यापकांना परीक्षेच्या दिवशी तात्काळ अध्यापन व इतर प्रशासकीय कार्यातुन कार्यमुक्त करण्यात यावे व त्यांची परीक्षा कार्यासाठीची उपस्थिती वैध व ग्राहय धरण्यात यावी.

सदर परिपत्रकातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

मुंबई – ४०००९८.
दिनांक ०२/०४/२०२६

Ymkaundale

डॉ. पुजा रौंदळे
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

....२....

# मुंबई विद्यापीठ



प्रति,

संचालक/प्रमुख, विद्यपीठाचे विविध शैक्षणिक विभाग, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य आणि संचालक, विद्यापीठाचे दुर व मुक्त अध्ययन संस्था.

प्रत माहितीसाठी:—

१. मा. कुलगुरू यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०००३२.
२. मा. कुलसचिव यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०००३२.
३. मा. संचालक BCUD यांची स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०००३२.
४. सर्व उपकुलसचिव (परीक्षा भवन)
५. सर्व सहाय्यक कुलसचिव (परीक्षा भवन)